नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक ३१/०३/२०२५ ( सोमवार ) संध्याकाळ

---

# अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद
## २५ लाख २५ हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त, १ आरोपी अटक
## १ आरोपी अटक,मौदा पोलीसांची कारवाई

**पोलीस स्टेशन मौदा** :— दिनांक ३१/०३/२०२५ रोजी मौदा पोलीस , पोलीस स्टेशन हददीत अवैध धंदयांवर कारवाई करणे कामी रात्री पेट्रोलींग करीत असतांना पोलीसांना गुप्त बातमीदार मार्फतीने माहीती प्राप्त झाली की, १० चक्का ट्रक कंमाक एम. एच. ३६ एफ २८७८ या वाहनाने भंडारा कडुन नागपुर कडे अवैध रित्या रेतीची चोरटी वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी एस.एम. पेट्रोलपंप, मौदा शिवार येथे नाकाबंदी केली असता १० चक्का ट्रक कंमाक एम. एच. ३६ एफ २८७८ मिळुन आले. वाहनाला थांबवुन चालकाला त्याचे नाव पत्ता विचारले असता **अनिल दिवाकर चाचेर ,वय ३७ वर्षे, पत्ता. गांधी वार्ड ,चांदोरी जि. भंडारा अशी माहीती प्राप्त झाली.** वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. चालकाला परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याने कोणताही परवाना नसल्याबाबत सांगितले. तसेच सदर रेतीची अवैध वाहतुक **वाहन मालक निखील उदाकर तरारे ,वय ३५ वर्षे,रा गांधी वार्ड, कोथुर्ना जि. भंडारा** यांच्या सांगण्यावरून करीत असल्याबाबत सांगितले. पोलीसांनी पंचासमक्ष १) वाहना मधुन ५ ब्रास रेती किंमती २५,०००/— रूपये आणि २) वाहन १० चक्का ट्रक कंमाक एम. एच. ३६ एफ २८७८ किंमती २५,००,०००/— रूपये **असा एकुण २५,२५,०००/—रूपयांचा मुददेमाल जप्त केला आहे.**

वाहन चालक आणि मालक **यांच्या** विरूध्द पोस्टे मौदा येथे **कलम ३०३(२),४९ भा.न्या.सं सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सह कलम ४,२१ खाण खनिज अधिनियम,सह कलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंध अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. चालक आरोपीला अटक करण्यात आली आहे.**




पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर